# मराठवाड्यातील गायरान जमीनधारकांचे शेती संबंधित प्रश्नांवरील अहवाल

सोपेकॉम

ऑक्टोबर २०१७

अर्थसहाय्य
मैत्रयी, मुंबई

सोपेकॉम, १६; काळे पार्क, सोमेश्वरवाडी रोड, पाषाण, पुणे ४११००८
फोन : ०२० २५८८६५४२
इमेल : soppecom@gmail.com
वेबसाईट : www.soppecom.org

# मराठवाड्यातील गायरान जमीनधारकांचे शेती संबंधित प्रश्नांवरील अहवाल

## प्रस्तावना

भारतातल्या जातीव्यवस्थेने दलितांना स्वतःच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक उन्नतीचे कुठलेही मार्ग खुले सोडलेले नाहीत. त्याचा एक परिणाम म्हणजे दलितांमध्ये असलेली मोठ्या प्रमाणातली भूमीहीनता. १९५० च्या दशकापासून दलित समाजाने बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून माणूस म्हणून सन्मान मिळविण्याचा लढा सुरू केला. गावातील गायरान जमिनी कसण्यासाठी ताब्यात घेणे हा त्यातील एक महत्वाचा भाग होता. मराठवाड्यात गायरानावरील ही अतिक्रमणे होण्यास १९५२-५३ सालापासून सुरुवात झाली. शासनाने दोन वेळा (१९७८ आणि १९९१) अतिक्रमित गायरान नियमानुकुलीत करण्यासंबंधी नियम काढले. ह्या नियमांची योग्य ती अंमबजावणी मात्र पुढील काळात झाली नाही, आणि गायरानधारकांचा जमिनीवरील हक्कांसाठीचा लढा अजूनही चालू आहे. उलट सध्याच्या शासकीय धोरणाचा कल गायरानावरील कसणाऱ्या शेतकऱ्यांना हटवून ती जागा वेगवेगळ्या प्रकल्पांसाठी मोकळी करण्याकडे दिसतो आहे. भूमिहीन दलित कुटुंबांसाठी अशाप्रकारे मिळालेली गायरान जमीन हा उपजीविकेसाठी मोठा आधार ठरू शकतो, परंतु जागा नावावर नसल्याने येणाऱ्या विविध समस्यांमुळे ती पूर्ण क्षमतेने कसणे शक्य होत नाही.

ह्या पार्श्वभूमीवर गायरानधारकांमधील जमिनीची मालकी, ती मिळविण्यामधील अडचणी, गायरानावरील शेती, आणि मुख्य म्हणजे गायरान नियमानुकुलीत होताना महिलांना मिळणारा अधिकार, आणि गायरान जमिनीसाठीचा लढा तसेच त्याचे व्यवस्थापन ह्यातील महिलांचा सहभाग समजून घेण्यासाठी एक छोटा अभ्यास सोपेकॉमने केला. त्या अभ्यासावर हा अहवाल आधारित आहे.

## अभ्यासाबद्दल

मराठवाड्यातील महिला शेतकऱ्यांची जमिनीवरील मालकी, शेतीमधील सहभाग, शेतीमधील पद्धती, शेती करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या विविध सुविधा, आणि महत्वाचे म्हणजे महिला सामुहिक शेतीचे काय प्रयोग करत आहेत हे समजून घेण्यासाठी हा अभ्यास करण्यात आला. बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यात जमीन, शेती, तसेच महिलांच्या बरोबर काम करणाऱ्या संस्था-संघटनांबरोबर मिळून हा अभ्यास करण्यात आला. ह्या संस्था-संघटनांच्या कार्यक्षेत्रातील विविध महिला शेतकऱ्यांशी संवाद साधणे हा ह्या अभ्यासाचा उद्देश होता. गायरानधारकांचे प्रश्न हा ह्या संस्था-संघटनांच्या कामाचा एक मोठा भाग राहिला आहे. त्यामुळे ह्या अभ्यासासाठी गायरानधारक शेतकरी महिला-पुरुषांशी देखील संवाद साधला. त्यामधून समोर आलेल्या माहितीची मांडणी करण्याचा प्रयत्न ह्याठिकाणी केला आहे. मराठवाड्यातील गायरानाच्या

लढ्याच्या इतिहासाबद्दल लिखाण झालेले असून, त्याबद्दल पुरेशी माहिती उपलब्ध आहे. त्यामुळे त्या तपशिलात न जाता, ह्या अभ्यासात पाहण्यात आलेल्या केसेस च्या आधारे गायरानधारक शेतकऱ्यांच्या शेती संबंधी प्रश्नांबाबत काही मांडणी करणे एवढाच ह्या छोट्या अहवालाचा उद्देश आहे.

जानेवारी ते मार्च २०१७ ह्या काळात केलेल्या तीन अभ्यास भेटींमधून ह्या अभ्यासासाठी माहिती गोळा करण्यात आली. अभ्यासातील माहिती मिळविण्यासाठी जमीन अधिकार आंदोलनाचा भाग असणाऱ्या पर्याय आणि जागर ह्या दोन संस्था तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ह्यांनी सहकार्य केले. अभ्यासामध्ये जेथे दलित कुटुंबांनी गायरान जमीन ताब्यात घेतली आहे अशा ७ गावांचा समावेश होता. माहिती मिळविण्यासाठी वैयक्तिक मुलाखती आणि गटचर्चा अशा दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात आला. एकूण ४ मुलाखती आणि ३ गटचर्चा घेण्यात आल्या. मुलाखतीसाठी वापरण्यात आलेली पद्धत ही भेटीच्या वेळीस उपस्थित व्यक्तींच्या संख्येवर अवलंबून होती. जेथे गट चर्चा शक्य होती तेथे त्याला वैयक्तिक मुलाखतीच्या तुलनेत अधिक महत्व दिले. या विशिष्ट केसेस तपशिलात पाहण्यापूर्वी मराठवाड्यातील गायरान जमिनीवरील लढ्याची थोडक्यात पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक आहे.

## मराठवाड्यातील गायरान जमिनींचा प्रश्न : पार्श्वभूमी

### मराठवाड्यातील जमिनीच्या मालकी संदर्भातील परिस्थिती

कोष्टक - शेती आणि मजुरी ही उत्पन्नाची साधने असणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी, Socio-economic caste census, २०११

| | शेती हे उत्पन्नाचे साधन असणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी | | | | मजुरी हे उत्पन्नाचे साधन असणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रदेश | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती/ जमाती व्यतिरिक्त इतर | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | अनुसूचित जाती/ जमाती व्यतिरिक्त इतर |
| महाराष्ट्र | 37 | 17 | 26 | 42 | 44 | 65 | 65 | 37 |
| मराठवाडा | 44 | 14 | 31 | 50 | 45 | 74 | 61 | 39 |
| बीड | 48 | 13 | 23 | 53 | 41 | 74 | 62 | 36 |
| उस्मानाबाद | 44 | 14 | 30 | 51 | 44 | 74 | 56 | 38 |

वरील कोष्टकावरून महाराष्ट्र, मराठवाडा, तसेच अभ्यासातील बीड आणि उस्मानाबाद हे दोन जिल्हे ह्या ठिकाणी वेगवेगळ्या जातींमधील उत्पन्नाची साधने काय आहेत हे दिसून येते. सर्व ठिकाणी इतर जातींच्या तुलनेत शेती करणाऱ्या अनुसूचित जाती आणि जमातीच्या कुटुंबांची संख्या लक्षणीय कमी असून त्याउलट ह्या जातींमधील मजुरीवर अवलंबून असणाऱ्या कुटुंबांची संख्या तुलनेने कितीतरी अधिक आहे. ह्यावरून

जाती आधारित संसाधनांची उपलब्धता दिसून येते. ह्या पार्श्वभूमीवर गायरान जमिनीवरील हक्कासाठी दलितांनी दिलेला लढा महत्वपूर्ण ठरतो.

## गायरान जमीन उपजीविकेसाठी मिळविण्यासाठीचा लढा

गायरान जमीन ही गावातील सार्वजनिक संसाधनांचा भाग असून तिचा मुख्य उद्देश गावातील जनावरांना चरण्यासाठी सार्वजनिक जमीन उपलब्ध करून देणे हा आहे. गावातील सर्व लोक ह्या जमिनीचा वापर गुरे चरण्यासाठी करू शकतात. इतर गावातील लोकांना ती वापरायची असल्यास गावाकडून तशी परवानगी घ्यावी लागते. गायरान जमिनीसंदर्भातील प्रशासकीय अधिकार हे ग्रामपंचायत किंवा राज्य शासनाकडे असतात.


चित्र 1 उपळी मधील अतिक्रमित गायरान जमीन

१९५० च्या दशकात भूमिहीन वंचित दलित समाजाने माणूस म्हणून सन्मानाने जगण्यासाठी जो लढा सुरू केला त्यामध्ये जमिनीच्या असमान वाटपाविरुद्धचा लढा हा महत्वाचा भाग होता. बाबासाहेब आंबेडकरांच्या मार्गदर्शनाखाली दादासाहेब गायकवाड ह्यांनी भूमिहीनांना जमीनीचा हक्क मिळवण्यासाठीचा सत्याग्रह सुरू केला. राज्यातील अनेक भूमिहीन शेतमजूर ह्यामध्ये सामील झाले आणि त्यांनी गावातील पडीक गायरान जमिनी ताब्यात घेतल्या, आणि गावातील प्रस्थापितांच्या प्रचंड विरोधाचा सामना करत त्या कसायला सुरुवात केली. दादासाहेब गायकवाडांनंतर दलित पक्ष आणि संघटना आणि पुढे भूमिहीन हक्क संरक्षण समितीने हा लढा सुरू ठेवला[1].

दलित संघटनांच्या रेट्यामुळे शासनाने प्रथम १९७८ आणि नंतर १९९१ मध्ये त्यावेळी अस्तित्वात असणारी गायरानावरील अतिक्रमणे नियमानुकुलीत करण्यासंबंधी निर्णय काढले. १९९१ मधील शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर अनेक बिगर शासकीय संस्था आणि संघटना ह्या लढ्यामध्ये सहभागी झाल्या, आणि त्यामुळे लढ्याला मोठा जनाधार प्राप्त झाला. ह्या संस्था-संघटनांनी मराठवाड्यात काम करणाऱ्या इतर संस्थांना हळूहळू ह्या लढ्याशी जोडून घेतले. ह्या संस्था-संघटना मानवी हक्क अभियान, मराठवाडा लोकविकास मंच म्हणून एकत्र झाल्या आणि त्यांनी गायरानधारकांना वेगवेगळ्या प्रकारे सहाय्य करण्याचे काम चालू ठेवले. अभियानाच्या प्रयत्नांनी सन १९९१ मध्ये २३९३८ कुटुंबांची जमीन नियमानुकुलीत झाली

सन २००० च्या सुमारास मराठवाड्यातील विविध दलित गट एकत्र आले आणि त्यांनी जमीन अधिकार आंदोलनाची स्थापना केली. सध्या २०० लोकसंघटना आणि गट आंदोलनाशी जोडलेले असून मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांमध्ये त्यांचे काम सुरू आहे (Paryay, 2004). आंदोलनाच्या माध्यमातून दलितांना गायरान जमिनीवर हक्क मिळवून देण्यासाठी विविध संरचनात्मक उपक्रम राबविले जातात. या

[1] व्हाय! आम्हाला मालक व्हायचं! – विश्वनाथ तोडकर

बरोबरच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले), भारिप बहुजन महासंघ यासारख्या दलित पक्ष संघटनाही या प्रश्नावर सातत्याने कार्यरत आहेत.

## शासनाचे धोरण

दलितांनी अतिक्रमित केलेली गायरान जमीन नियमानुकुलीत करण्यासंबंधीचे महाराष्ट्र पातळीवरचे महत्वाचे शासन निर्णय १९७८ व १९९१ साली महाराष्ट्र शासनाने काढले. त्यांनतर अतिक्रमित गायरान जमीन नियमानुकुलीत करण्यासंबंधीचा नवीन शासन निर्णय आलेला नाही. त्यामुळे सध्या १९९१ च्या निर्णयाप्रमाणे केवळ १४ एप्रिल १९९० ला अस्तित्त्वात असणारी गायरान अतिक्रमणेच नियमानुकुलीत होऊ शकतात. १९९१ नंतर ही १९७८ आणि १९९१ च्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची कार्यपद्धती ठरविण्याबद्दलचे काही शासन निर्णय शासनाने काढले. पण त्याच बरोबर गायरान जमिनीवर नवीन अतिक्रमणे होऊ नयेत, व ती झाल्यास ती बेकायदेशीर ठरवून, अतिक्रमण करणाऱ्यांना हटवण्याबाबतचे निर्णय शासनाने त्यांनतर सन १९९९, २००८ आणि २०११ साली काढले.


धडक कारवाई करत हटवले
वन जमिनीवरील अतिक्रमण

चित्र 2 गायरानावरील अतिक्रमण हटविण्यासंदर्भातील बातमी

१९९१ नंतर धोरणात झालेला दुसरा बदल म्हणजे गायरान जमीन ही भूमिहीन शेतकऱ्यांना कसण्यासाठी खुली करून देण्यापेक्षा विविध शासकीय आणि खाजगी प्रकल्पांना देण्याकडे शासनाचा असलेला कल. डिसेंबर २०१६ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयावरून ह्या बाबतीत घेतलेली ठोस पाऊले दिसून येतात. २७ डिसेंबर २०१६ रोजी झालेल्या १११ व्या मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या संहिता २२ मध्ये कलम (क) समाविष्ट करण्यात आला. त्या अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आले आहेत कि काही विशिष्ट परिस्थितीत गावातील गायरान म्हणून असलेली शासकीय जमीन हि विविध प्रकल्पांसाठी केंद्र किंवा राज्य शासनास किंवा त्यांच्या कोणत्याही कायदेशीर प्राधिकरणास भाडेपट्ट्याने किंवा कब्जाहक्काने देता येईल. हीच जमीन जर खाजगी प्रकल्पासाठी देण्यात आली तर प्रकल्प धारकाला त्या बदल्यात त्याच गावात तेवढ्याच किमतीची व दुप्पट क्षेत्रफळाची जमीन देणे बंधनकारक राहील. हि जमीन गायरान म्हणूनच वापरण्यात येईल अशी तरतूद या बैठकीत मान्य करण्यात आली आहे.

शासनाच्या धोरणात अलीकडे झालेला आणखी एक बदल म्हणजे गायरान जमिनी वन विभागाकडे वळत्या करणे. १९९१ च्या शासन निर्णयाच्या विभाग ९ मध्ये शासकीय पड आणि गायरान जमिनी वनीकरणासाठी व इतर सार्वजनिक प्रयोजनासाठी प्रदान करण्याचीही तरतूद मांडलेली आहे. त्याच्या आधारे अनेक गायरान जमिनी ज्या कसल्या जात आहेत ह्याचा विचार न करता, कोणतीही सूचना न देता वन विभागाकडे वळत्या करण्यात येत आहेत.

शासनाच्या ह्या बदलत्या धोरणांचा परिणाम अभ्यास केलेल्या काही गावांमध्ये दिसून आला. अभ्यासातील एका गावामध्ये गायरानधारक अनेक वर्षे कसत असलेली जमीन, त्यांच्या कसण्याची दखल न घेता वन विभागाकडे वर्ग करण्यात आली तर दुसऱ्या ठिकाणी ती जमीन पॉवर ग्रीड प्रकल्पासाठी देण्यात आली.



चित्र 3 जमीन कसली जात असताना कुठलीही सूचना न देता पॉवर ग्रीड प्रकल्पासाठी घेण्यात आलेली गायरान जमीन

## अभ्यासातील निरीक्षणे

ह्या पार्श्वभूमीवर ह्या छोट्या अभ्यासातून समोर आलेल्या मुद्यांची मांडणी ह्यापुढील भागांमध्ये केली आहे

### अभ्यासात समाविष्ट असणाऱ्या केसेस

अभ्यासात समाविष्ट केलेल्या केसेस ह्या वेगवेगळ्या प्रकारच्या होत्या. दोन ठिकाणी जमीन नियमानुकुलीत झाली होती, तर बाकी ठिकाणी अजून त्यासाठीचे प्रयत्न चालू होते. दोन ठिकाणी सरकारने गायरान धारकांकडून जमीन काढून घेतलेली होती. ह्या सर्व ठिकाणी लढ्यामध्ये तसेच शेतीच्या व्यवस्थापनात महिला अग्रभागी होत्या. ह्या केसेसची थोडक्यात माहिती पुढील कोष्टकात दिली आहे.

| **गाव, तालुका, जिल्हा** | **गायरान अतिक्रमणाची पार्श्वभूमी** | **सध्याची परिस्थिती** | **सिंचनाची सोय** | **सामुहिक शेती** |
|---|---|---|---|---|
| लाखणगाव, कळंब, उस्मानाबाद | ३० दलित कुटुंबे मिळून ८० एकर गायरान जमीन कसत आहेत. प्रथम १९७६ साली कसण्यास सुरुवात केली. परंतु काही वर्षांनी त्यामध्ये खंड पडला. २००२ साली परत कसण्यास सुरुवात केली. | २००२ पूर्वीचे कसण्यासंबंधीचे पुरावे नाहीत. सध्या नियमानुकुलीत करून घेण्यासाठी प्रयत्न चालू. ती जमीन वनखात्याकडे वळती करण्यात आलेली आहे. | गायरान जमिनीच्या बाजूला असलेल्या तळयामधून उपसा सिंचन | २००२-०४ गायरानधारक सर्व जमीन संयुक्तपणे कसत होते. त्यानंतर जमिनीच्या वाटण्या करून प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र जमिनीचा तुकडा दिला. अजूनही नांगरणी सारख्या काही गोष्टी एकत्र करतात, तसेच सावड पद्धतीचा अवलंब करतात. |
| घारगाव, कळंब, उस्मानाबाद | २२ दलित कुटुंबे मिळून एकूण ३४ एकर गायरान जमीन सन १९८९ पासून कसत आहेत. | सध्या नियमानुकुलीत करून घेण्यासाठी प्रयत्न चालू. ती जमीन वनखात्याकडे वळती करण्यात आलेली आहे. | जमिनीला कालव्याचे पाणी मिळू शकते, परंतु जमीन नावावर नसल्याने मिळत नाही | मळणी यंत्र भाड्याने घेण्यासारख्या काही गोष्टी एकत्र करतात, तसेच सावड पद्धतीचा अवलंब करतात. |

| **गाव, तालुका, जिल्हा** | **गायरान अतिक्रमणाची पार्श्वभूमी** | **सध्याची परिस्थिती** | **सिंचनाची सोय** | **सामुहिक शेती** |
|---|---|---|---|---|
| गोजवाडा, वाशी, उस्मानाबाद | ४८ दलित कुटुंबे सन १९७६ पासून १६० एकर गायरान जमीन कसत आहेत. | सध्या ती जमीन वनखात्याकडे वळती करण्यात आलेली आहे. वन खात्याने त्या जमिनीवर मोठे चरे खंदून जमीन कसण्या लायक ठेवली नाही. तरीही ती नियमानुकुलीत करण्यासाठीचे प्रयत्न चालू ठेवलेले आहेत | विहिरीचे पाणी उपलब्ध | गायरानधारकांनी सामुदायिक विहिरी घेतल्या आहेत. |
| उपळी, वडवणी, बीड | २२ दलित कुटुंबे १५२ हेक्टर जमीन १९९० सालापासून कसत आहेत. | जमीन अजून नियमानुकुलीत झालेली नाही. | कुंडलिक धरणातून उपसा करून सिंचनाचे पाणी मिळते. | सावड पद्धतीचा अवलंब करतात. |
| मण्यारवाडी, गेवराई, बीड | १९८१ पासून १६ दलित कुटुंबे गायरान जमीन कसत होते. सन २००५ पासून अजून ११ कुटुंबांनी गायरान अतिक्रमित करून कसायला सुरुवात केली आहे | २०१२ मध्ये १६ कुटुंबांना प्रत्येकी ०.७२ आर जमीन त्यांच्या नावाने करून मिळाली. बहुतेक जमिनी कुटुंबातील पुरुषांच्या नावाने झालेल्या आहेत. केवळ एक विधवा महिलेच्या नावे जमीन झाली आहे. २००५ मध्ये अतिक्रमण केलेल्या कुटुंबांचा त्यासाठी प्रयत्न चालू आहे. | जमीन नावावर झाल्याने विहिरी घेणे शक्य झाले. | सावड पद्धतीचा अवलंब करतात. |
| धानोरा, आंबेजोगाई, बीड | २७ एकर जमीन ३१ दलित कुटुंबे सन २००८ सालापासून कसत आहेत. | ऑक्टोबर २०१६ मध्ये ही जमीन शासनाने पावर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या भारत सरकारच्या वीज पुरवणाऱ्या कंपनीला त्यांच्या प्रकल्पासाठी देऊन टाकली. | | सावड पद्धतीचा अवलंब करत होते. |
| राजुरी घोडका, बीड, बीड | ५०-६० वर्षांपूर्वी गायरान नियमानुकुलीत होऊन दलित कुटुंबांना जमिनी मिळाल्या. | जमिनी कुटुंबातील पुरुषांच्या नावावर नियमानुकुलीत झाल्या आहेत. | तलाव, विहिरीचे पाणी उपलब्ध | काही शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामुहिक विहीर घेतली आहे. |

## गायरान मिळविताना झालेला विरोध

*"त्यांना वाटतंय अजून आम्ही जनावराचं शेण पाणी करावं, भांडी करावी, मजुरीला जावं, म्हणून हे असं करताहेत"*- गायरानधारक महिला, धानोरा

दलितांनी जेव्हा गायरान जमीन ताब्यात घेऊन कसायला सुरुवात केली त्यावेळी गावातील लोकांनी त्यांना वेगवेगळ्या प्रकारे विरोध केला. बहुतेक गायरानधारकांना बहिष्काराचा सामना करावा लागला. त्यांच्या मुलांना शाळेत येऊ देत नव्हते. गावातील रेशन दुकान, गिरणी त्यांना वापरता येत नव्हते. सतत जातीवाचक अपमानास्पद बोलणे त्यांना सहन करावे लागले. गावातील इतर शेतकऱ्यांनी त्यांना जमीन कसण्यासाठी ट्रॅक्टर, बैल इत्यादी देण्यास नकार दिला. गायरानधारकांनी घेतलेले पिक आले की त्यामध्ये स्वतःची गुरे सोडून ते नष्ट करून टाकायचे. काही ठिकाणी विरोधाला ह्यापेक्षाही अधिक हिंसक वळण प्राप्त झाले. गायरानधारक दलितांवर सशस्त्र हल्ले झाले, त्यांची घरे जाळण्यात आली.

मण्यारवाडीमध्ये अलीकडेच गायरान जमीन नावावर होऊन, सर्व कागदपत्रांची पूर्तता झाली तरी एका गायरान धारक शेतकऱ्याच्या शेतातील काही भागावर गावातील एका उच्चजातीय शेतकऱ्यांनी अजूनही कब्जा ठेवलेला आहे. उपळीमध्ये अलीकडेच एक दलित कुटुंब कसत असलेली एक एकर जमीन मंदिराच्या बांधकामासाठी सोडून देण्यास गावकऱ्यांनी भाग पाडले.

पूर्वी गायरान कसण्यावरून गावातील उच्चजातीय आणि दलित ह्यांच्यात संघर्ष होऊन त्याबद्दल पोलीस केस झाल्यास गायरानधारकांना त्याचा एक फायदा हा होत असे की त्या केसचा पंचनामा हा गायरान कसत असल्याचा पुरावा म्हणून दाखल करता येत असे. हे माहित झाल्यामुळे असे पुरावे निर्माण होऊ नयेत ह्यासाठी आता गावातील उच्चजातीय शेतकरी असे उघड संघर्ष करणे टाळतात.

गावातील उच्चजातीयांच्या बरोबरीनेच तलाठी, गीरीधावर ह्यासारख्या सरकारी अधिकाऱ्यांकडूनही गायरान धारकांना अशाच प्रकारची वागणूक मिळते. गायरान कसत असल्याचे पुरावे निर्माण होऊ नयेत ह्यासाठी ते जाणीवपूर्वक गायरानांवरील अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करतात. पिकांचा पंचनामा करण्याची मागणी वारंवार येऊनही तो करून घेत नाहीत. *"गिरधावर आणि तलाठी आमच्या रानात आले, फोटो काढून गेले. आमच्या रानामध्ये डहाळे पण खाऊन गेले. पण त्यांनी लेखी काही करून दिलं नाही,"* लाखणगावच्या ताई सुरवसेंनी सांगितले.

गोजवाडा गावात सुरुवातीला गायरानधारकांना इतर गावकऱ्यांचे सहकार्य होते, परंतु २०१५ मध्ये काही कारणाने त्यांच्यात झालेल्या भांडणानंतर गावकऱ्यांनी त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. एवढेच नाही तर वन विभागाला ती जमीन हस्तगत करण्यासाठी सहकार्यही केले. २०१५ मध्ये ती जमीन वन विभागाकडे वर्ग झाली. २०१७ मध्ये परत एकदा ती जमीन कसण्याचा प्रयत्न जेव्हा दलितांनी केला त्यावेळी झालेल्या संघर्षानंतर वन विभागाने त्यांच्या विरोधात आय. पी. सी. च्या कलम १४७ आणी १४८ (दंगल संबंधित

गुन्हे) खाली गुन्हा दाखल केला. ज्या गायरान धारकांवर गुन्हा दाखल केला त्यामध्ये १२ दिवसांची एक बाळंतीण महिला तसेच वयस्कर महिला-पुरुषांचा देखील समावेश होता.

दलितांनी गायरान जमीन कसायला सुरुवात केल्यामुळे गावातील सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक संरचनेमध्ये जे बदल होत गेले त्याला गावातील उच्चजातीय प्रस्थापित आणि स्थानिक पातळीवरील शासकीय अधिकारी ह्यांच्याकडून अशा विविध प्रकारे विरोध करण्यात आला. परंतु त्याच वेळी ह्या गायरानधारकांना जमीन अधिकार आंदोलन, पर्याय ह्यासारख्या संस्था-संघटनांकडून त्यांच्या लढ्यामध्ये मोलाचे सहाय्य मिळाले.

## गायरानधारकांना उपलब्ध असणाऱ्या आधार व्यवस्था

गायरान जमीन हस्तगत करून ती कसण्यासाठी प्रोत्साहन देण्यामध्ये दलित चळवळी सुरुवातीपासूनच सक्रीय होत्या. १९९० च्या नंतर त्यांच्या बरोबरीने बिगर शासकीय संस्था देखील त्यामध्ये पुढाकार घेऊ लागल्या. लाखणगाव मध्ये १९७६ पासून तेथील दलित कुटुंबे गायरान कसत होती. परंतु मधील काळात गावकऱ्यांचा प्रचंड विरोध तसेच दुष्काळातील स्थलांतर ह्यामुळे त्यांनी ही जमीन कसणे बंद केले. सन २००२ मध्ये पर्याय संस्थेच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पुन्हा एकदा ही जमीन कसण्यास सुरुवात केली. अभ्यास केलेल्या भागात पर्याय च्या व्यतिरिक्त जमीन अधिकार आंदोलनाशी संबंधित रुरल डेव्हलपमेंट सेंटर आणि जागर प्रतिष्ठान ह्या दोन संस्थांचे कार्य महत्वाचे राहिले आहे.

जमीन अधिकार आंदोलनाच्या माध्यमातून ह्या संस्था गायरानधारकांना अतिक्रमण टिकवून ठेवणे आणि जमीन कसणे ह्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे सहाय्य करतात - जसे की जमीन नियमानुकुलीत करून घेण्यासाठी दबावगट म्हणून काम करणे, जमिनीच्या हक्कांसंबंधी भूमिहीनांमध्ये जाणीवजागृती करणे, जमीन नावावर होताना पती-पत्नी दोघांच्या नावाने होईल ह्यासाठी प्रयत्न करणे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे, शेती संबंधित प्रशिक्षणे देणे, औजारे उपलब्ध करून देणे इत्यादी.

ह्या संस्था-संघटनांनी उभे केलेले एक महत्वाचे काम म्हणजे अनिक फायनान्स सर्विसेस प्रा. ली. ह्या बँकेची स्थापना. जमीन अजून नावावर नसल्याने गायरानधारकांना सावकाराकडून कर्ज घेण्याशिवाय इतर पर्याय उपलब्ध नाहीत. ह्या परिस्थितीवर उपाय काढण्यासाठी अनिकची स्थापना करण्यात आली. अनिकमध्ये ६० टक्के गायरानधारक, २० टक्के भूमिहीन दलित व २० टक्के अन्य जातीच्या महिला भागधारक आहेत (खुंटे, २०११ ). कंपनीच्या संचालक पदी गायरान धारक महिला आहेत. या बँकेमार्फत जमिनीची दुरुस्ती, बोर घेणे, जनावरांची खरेदी, छोटे व्यवसाय अशा उपजीविकेची साधने निर्माण करणाऱ्या गोष्टींसाठी कर्ज दिले जाते. अनिकमुळे गायरानधारकांना कर्ज मिळविण्यासाठी स्त्रोत उपलब्ध झाला आणि शेती टिकवून ठेवणे शक्य झाले.

ह्याबरोबरच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) आणि भारिप बहुजन महासंघ हे दोन राजकीय पक्ष देखील ह्या कामात पुढाकार घेत आहेत. मण्यारवाडीमध्ये आर. पी. आय. (आठवले) ने गायरान नावावर करून घेण्यासाठी आंदोलन करून राजकीय दबाव निर्माण करणे तसेच त्यासाठी कायदेशीर सल्ला देणे,

ह्या बरोबरीने गावकऱ्यांचा विरोध होऊ नये ह्यासाठी प्रत्यक्ष गावात उपस्थित राहून शेती करण्यासाठी मानसिक आधार देणे, तसेच गावातील इतर शेतकऱ्यांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी त्यांना औजारे पुरविणे हे देखील केले. १९९१ पूर्वीच्या गायरान धारकांना जमिनी नियमानुकुलीत करून देण्यासाठी अशा केसेसचा पाठपुरावा ते करत आहेत, तसेच जमीन नियमानुकुलनाची मर्यादा वाढविण्यासाठीही त्यांचे आंदोलन चालू आहे.

## गायरानासाठीच्या संघर्षामधील महिलांचा सहभाग

गायरान जमिनीसाठीच्या भूमिहीन दलितांच्या लढ्यामध्ये महिलांचा सहभाग महत्वाचा राहिला आहे. अनेक गावांमध्ये महिला नेतृत्वाच्या भूमिकेत होत्या. जमिनीसाठी प्रस्थापितांशी आणि सरकारशी द्यावा लागणारा लढा आणि शेती ह्या दोन्ही मध्ये त्या अग्रभागी राहिल्या आहेत. अभ्यास केलेल्या गावांमध्येही अशाच खंबीर महिला नेत्यांची उदाहरणे पुढे आली.

लाखणगावमध्ये २००२ साली जेव्हा दलितांनी परत गायरान जमीन कसण्यास सुरुवात केली त्यावेळी ताई सुरवसे ह्या तरुण महिला कार्यकर्त्यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. गावातून विरोध होईल ह्या भीतीने इतर दलित हे करण्यासाठी कचरत होते, परंतु ताईंनी त्यांना प्रोत्साहित केले. त्यांच्या वारंवार बैठका घेऊन जमीन कसण्यासाठीचे नियोजन केले. सर्वांकडून वर्गणी गोळा करून जमीन कसण्यालायक करून घेतली. अजूनही एकत्रितपणे सर्वांची नांगरणी वगैरे करवून घेण्याची कामे त्या करतात.

घारगावमध्ये अशाच प्रकारे मंगला आणि सुनंदा ह्या दोघींनी गायरान कसण्यामध्ये पुढाकार घेतला. त्या पर्याय संस्थेशी जोडलेल्या बचतगटाच्या अध्यक्ष व सचिव होत्या. सुरुवातीला त्या दोघीच गायरानावर रोज जाऊन जमिनीची सफाई करण्याचे काम करत. कोणत्याही प्रकारची उपकरणे नसल्याने त्यांनी खुरप्यानेच पेरणी देखील केली. पुढे त्यांच्या घरातील इतर लोक, आणि गावातील इतर दलित कुटुंबे त्यांच्याबरोबर सहभागी झाली. जे लोक गावातून होणाऱ्या विरोधाला घाबरून गायरान कसायला घाबरत होते, त्यांना मानसिक पाठबळ देऊन कसायची हिंमत देण्याचे महत्वाचे काम ह्या दोघींनी केले. मंगलताई सांगतात,*"लोक म्हणायचे नेतील तुम्हाला अडकवून मी म्हणायचे, नेऊ द्या. इथे (घरी) ही खायचंच आणि तिथेही (तुरंगात) खायचंच."*

उपळीमधील कांता इचके जमीन अधिकार आंदोलनाशी अनेक वर्षांपासून जोडलेल्या आहेत. गावातील शिवसेनेचे तरुण लोक गायरानधारकांना जीवे मारण्याच्या, गायरानाला कंपाउंड घालण्याच्या, आणि त्यांना इथून हाकलून देण्याच्या धमक्या देत होते. ते लोक जेव्हा प्रत्यक्ष तिथे येऊन कंपाउंड करण्याबद्दल पाहणी करायला लागले त्यावेळी अॅट्रॉसिटी कायद्याचा बडगा दाखवून त्यांना कांता इचके यांनी निघून जाण्यास भाग पाडले. फारसे शिक्षण झालेले नसतानाही अनेक वर्षांच्या चळवळीमधील अनुभवाने कांताताई खंबीरपणे दलित गायरानधारकांचे नेतृत्व करू शकतात.

गायरान मिळविण्यासाठीच्या लढयाबरोबरच ती कसण्यामध्येही महिला अग्रभागी राहिल्या आहेत. गायरानावरील झाडेझुडपे साफ करणे, उपकरणे नसताना कुदळ आणि खुरप्याच्या सहाय्याने पेरणी करणे

अशी सर्व कष्टाची कामे त्यांनी केली. प्रसंगी मुलांना पाठीवर बांधून त्यांनी पेरण्या केल्या, आणि गायरानावरील पिकाचे रक्षण करण्यासाठी गायरानातच वास्तव्य केले. शेती मधील कामांचा मोठा वाटा महिलांकडूनच उचलला जातो.

असे असले तरी गायरान जमीनीवरील महिलांच्या हक्कांच्या बाबतीत मात्र परिस्थिती वाईट आहे असेच दिसते. गायरानासंदर्भातील १९९१ च्या शासन निर्णयात ती नियमानुकूल करताना पती-पत्नी दोघांच्या नावे व्हावी असे स्पष्ट आदेश आहेत. तसेच कोणत्याही प्रकारची शासकीय जमीन देताना ती पती-पत्नीच्या संयुक्त नावाने दिली पाहिजे असा शासनाचा निर्णय आहे (१९९४). जमीन अधिकार आंदोलनाने देखील गायरान नियमानुकुलीत होताना पती-पत्नी दोघांच्या नावावर झाली पाहिजे अशीच भूमिका घेतलेली आहे. त्याप्रमाणे अर्ज करत असताना पती-पत्नी दोघांच्या नावानेच केले जातात. तसेच दर सहा महिन्याला गायरानधारक कसण्याचा पुरावा म्हणून पिकाची माहिती, फोटो, आणि पिकांचा पंचनामा करण्याचे निवेदन शासकीय अधिकाऱ्यांना सादर करतात. हे निवेदन देखील पती-पत्नी दोघांच्या नावाने, दोघांच्या फोटोंसह दिले जाते. संघटनेचा रेटा आणि शासकीय नियम असताना देखील प्रत्यक्षात जमीन नियमानुकुलीत करत असताना ती दोघांच्या नावाने करण्यास शासकीय अधिकाऱ्यांचा विरोध असलेला दिसतो. मण्यारवाडी गावात जेथे जमिनी नियमानुकुलीत करून मिळाल्या आहेत, त्याठिकाणी १६ पैकी केवळ एका विधवा महिलेच्या नावाने जमीन मिळाली होती. बाकी सर्व जमिनी केवळ कुटुंबातील पुरुषांच्या नावाने मिळालेल्या होत्या. ह्याबद्दल चौकशी केली असता तलाठ्याने आपल्याला अशा शासकीय नियमाची माहिती नसून जमीन दोघांच्या नावाने देता येत नाही असे सांगितले.



**चित्र 4 गायरानाचा पंचनामा करण्यासाठी जमीन अधिकार आंदोलनाच्या वतीने पती-पत्नी दोघांच्या मार्फत करण्यात आलेला अर्ज**

ह्या प्रश्नावर काम करणाऱ्या संस्था-संघटनांच्या प्रयत्नामुळे गायरानधारकांमध्ये महिलांचाही जमिनीवर अधिकार आहे ही भावना निर्माण झाली आहे, ही जमेची बाजू आहे. प्रत्यक्षात जमिनी महिलांच्या नावाने का होत नाहीत, ह्याविषयी अधिक तपशिलात अभ्यास करून तसे होण्यासाठी नेमकी काय पाऊले उचलली पाहिजेत हे ठरविण्याची गरज आहे.

स्त्रियांना जमिनीवर अधिकार मिळविणे एकूणच किती अवघड आहे हे संजीवनी पवारच्या उदाहरणावरून दिसून आले. त्यांच्या आजे सासऱ्याला १९५० च्या दशकात जमीन नियमानुकुलीत करून मिळाली होती. ती त्यांचे सासरे आणि मग नवऱ्याकडे आली. त्या २२ वर्षांच्या असताना त्यांचा नवरा गेला. नवऱ्यानंतर त्या ती जमीन कसायला लागल्या. त्यांचे चुलत सासरे वगैरे काही नातेवाईकांनी त्यांच्या हिश्शाची जमीन त्यांना मिळू नये ह्यासाठी त्यांना फार त्रास दिला. संजीवनीताई सांगतात, *"माझं वय तेव्हा काहीच नव्हतं. २२ वर्षांची होते मी नवरा वारला तेव्हा. एक चुलत सासरा होता. इतका त्रास द्यायचा मला! समोर काहीही करायचा, घाण घाण शिव्या द्यायचा, थुंकायचा, समोर लघवीला बसायचा. रात्री अंधारात मागे यायचा.*

*त्यांना वाटायचं मी इथे रहायला नाही पाहिजे. मी लेकरांना घेऊन निघून गेले की मग शेती त्यांना मिळेल. त्यामुळे ते मला त्रास द्याचे. शेतामधून बांध टाकायचे, पेरणी अलीकडे करायचे. मारण्यापर्यंत धमकी दिली होती मला. मला म्हणायचे तू असं टाईटपणाने वागतेस, आम्हाला काही मागत नाहीस. तुझ्या तुझ्या हिंमतीवर चालतेस. आम्ही तुझी जमीन घेऊ, तुला पाया पडायला लावू. मी म्हणायचे का लोकांना मागायचं. आपली लेकरं आहेत आपणच सांभाळायची. आपल्या आपल्या हिंमतीवर करायचं."* ह्या सर्व परिस्थितीत जमीन हातातून जाऊ नये ह्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. जमीन आपल्या नावावार ठेवली तर नातेवाईक आपल्याला मारून टाकलीत आणि मग मुलांना काहीच मिळणार नाही ह्या भीतीने त्यांनी जमीन मुलांच्या नावावर करून घेतली.

## गायरान जमिनीवरील शेती

### पिके

*"स्वतःला वापरायसाठी घेतो. विकण्याची काही अपेक्षा नाही. जेवढ खायला लागेल तेवढच पेरतो आम्ही."* - गायरानधारक महिला, घारगाव

गायरानधारक प्रामुख्याने उदरनिर्वाहासाठी लागणारे अन्नधान्य आणि कमी पाणी लागणारी काही नगदी पिके घेतात. गायरान कसण्याचा मुख्य हेतू खाण्यापुरते अन्न मिळविणे हा असलेला दिसतो. गायरानधारक घेत असलेल्या पिकांमध्ये प्रामुख्याने ज्वारी (देशी आणि हायब्रीड), बाजरी, पिवळी, तूर, मुग, उडीद, तीळ, भुईमुग ही पिके दिसतात. रबी मध्ये पाणी उपलब्ध झाल्यास गव्हाचे पिक घेतले जाते. हे धान्य स्वतःच्या खाण्यासाठी ठेवले जाते. ह्या अन्नधान्याच्या बरोबर खर्चाला पैसे मिळविण्याच्या हेतूने कापूस आणि सोयाबीन ही नगदी पिकेही घेतली जातात. ज्याठिकाणी गायरान जमीन नावावर झाली आहे, तिथेही हीच पिके घेतलेली दिसून येतात. उपळी हे असे एकच गाव होते, ज्याठिकाणी गायरानधारक उसाची लागवड करत होते.

### सेंद्रिय शेती

दलित गायरानधारकांना शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे शक्य होत नाही. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करून, शेती टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने जमीन अधिकार आंदोलनाने गायरानधारकांना सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी सेंद्रिय शेतीची प्रशिक्षणे देखील वेळोवेळी आयोजित केली. परंतु अभ्यास केलेल्या गावांमध्ये सेंद्रिय शेती पद्धत टिकून राहिली नाही असे दिसून आले. अभ्यासामध्ये केवळ एक शेतकरी संपूर्ण सेंद्रिय शेती करणारे आढळले. इतर गायरानधारक सेंद्रिय आणि रासायनिक खते आणि बियाणे यांचा मिश्र वापर करत होते. सेंद्रिय शेती का करत नाही असे विचारले असता, बहुतेक लोकांनी खताची अनुपलब्धता हे कारण सांगितले. मण्यारवाडी मधील मारुती निसरगंध ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे जर १ गाय/ बैल/ म्हैस असेल तर त्याच्यापासून वर्षाला २० गुंठ्याला पुरेल एवढे शेणखत तयार होऊ शकते. त्यामुळे उरलेल्या शेतीसाठी रासायनिक खते वापरावी लागतात. सेंद्रिय खत बाजारातून किंवा इतर शेतकऱ्यांकडून विकत घेता येऊ शकते, पण त्याची किंमत रासायनिक खतांपेक्षा अधिक असल्याने ती

परवडत नाहीत. संजीवनी पवार ह्या विधवा शेतकरी महिलेचेही तेच म्हणणे होते. त्यांना एकट्याने शेती आणि गुरे दोन्ही सांभाळणे शक्य होत नसल्याने त्यांच्याकडे स्वतःची गुरे नाहीत, आणि त्यामुळे सेंद्रिय शेती करणे त्यांना शक्य होत नाही.

ताई सुरवसे स्वतः गांडूळ खत, लिंबोणी अर्क इत्यादी बनवून विकण्याचा व्यवसाय करत असत, परंतु त्यामध्ये खूप कष्ट असल्याने त्यांनी ते काम बंद केले.

लहू इचके हे एकमेव शेतकरी अजूनही सेंद्रिय शेती करत होते ते म्हणतात, *"कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळतं. शेतकरी कर्जबाजारी होत नाही. सोनं गहाण ठेवण्याची गरज पडत नाही. निरोगी अन्न मिळतं. जमिनीत गारपणा टिकून राहतो."* त्यांच्यामते बाजारातून बियाणे आणि खते आणण्यापेक्षा गावरान पद्धतीचं साठवलेलं बियाणं आणि सेंद्रिय खते वापरल्याने शेतीमधील खर्च खूप कमी होतो, आणि शेती करणे परवडते.

एकूण गुरांची अनुपलब्धता, सेंद्रिय खते आणि बियाणांच्या बाजारातील अधिक किंमती आणि सेंद्रिय खते/औषधे घरी तयार करण्यामधील कष्ट ह्या सेंद्रिय पध्दतीने शेती करण्यामधील अडचणी दिसून आल्या. त्यामुळे जमीन अधिकार आंदोलनाने सुरुवातीला प्रयत्न करून देखील सेंद्रिय शेतीची पद्धत टिकून राहिलेली नाही.

## शेतीमधील निविष्ठा

### *बियाणे, खते इत्यादी साहित्य*

बियाणे किंवा खते यासारखे साहित्य खरेदी करण्यासाठी गायरानधारकांकडे मर्यादित पर्याय उपलब्ध आहेत. स्थानिक दुकानात थोड्या अधिक किंमती असल्या तरी ते त्याठिकाणी खरेदी करतात कारण स्थानिक दुकानदार त्यांना उधारीने माल देण्यास तयार असतो. इतर शेतकरी गट शहरातून माल विकत आणतात तसे ह्यांना करणे शक्य होत नाही कारण तसा माल विकत आणण्यासाठी आवश्यक तेवढे नगद पैसे त्यांच्याकडे नसतात. पिक आल्यावर ते दुकानदाराचे पैसे परत करतात. पिकाचे नुकसान होऊन उधारी फेडणे शक्य न झाल्यास ऊस तोडणी कामगार म्हणून कामाला जाऊन पैशांची परतफेड केली जाते.

### *शेतीसाठी लागणारी औजारे*

बहुतेक गायरानधारकांकडे खुरपी, विळी, कोळपं अशी प्राथमिक औजारे होती, परंतु नांगरणी/ पेरणी साठी ट्रॅक्टर, मळणी यंत्र, फवारणी यंत्र अशी उपकरणे, त्यांना इतर शेतकऱ्यांकडून भाड्याने घ्यावी लागतात. काही शतकरी पेरणीसाठी बैल देखील भाड्याने घेतात. अनेकदा नांगरणी/ पेरणीसाठी उपकरणे वेळेवर न मिळाल्याने पेरणी साठी उशीर होऊन उत्पादनावर त्याचा परिणाम होतो. दलितांनी गायरान जमीन कसण्यास जेव्हा गावातील लोकांचा विरोध असतो, त्यावेळी गावातील इतर शेतकऱ्यांकडून ही उपकरणे मिळविणे त्यांना अवघड होते.

एकट्या स्त्रियांना अशा प्रकारची उपकरणे मिळविण्यात अधिकच अडचणी येतात. उपळी गावातील एका विधवा गायरानधारक महिलेने तिचा अनुभव सांगितला, *“औतंवाल्याच्या दाराला चारदा जायचं. ए बाबा चल ना असं म्हणायचं. तो जिकडे नगदी आहे ना तिकडेच पळतो, आणि माझं मागं ठेवतो. कारण माझी उधारी राहते ना. तो आज येतो, उद्या येतो असं करतो. मग पेरायला उशीर झाला की फरक पडतो. आता त्याच्याकडे बैल आहेत म्हंटल्यावर आपल्याला त्याच्या दारात चार चकरा करायलाच लागतात. बाई माणसाला कुणी जास्त डिमांड देत नसतं. त्या बैलवाल्याला काय वाटतं, की या बाईपाशी काय आहे, ती कधी पैसे देईल. गडी चटकन काम करेल आणि आपल्याला पैसे देईल. मग त्याला बाबा, दादा म्हणून, त्याच्या शेताला शंभर चक्कर मारून पेरून घ्याव लागतं.”*

## *सिंचन*

शेतीसाठी विहीर खोदणे किंवा सिंचनाचे पाणी मिळविणे ह्यासाठी जमिनीवर मालकी असणे महत्वाचे ठरते. घारगाव मध्ये गायरानधारकांच्या जमिनीला कालव्याने पाणी मिळू शकते, परंतु सध्या ती जमीन त्यांच्या नावावर नसल्याने त्यांना पाणी घेता येत नाही. पाण्याच्या अभावी ते केवळ खरीपातील पिक घेऊ शकतात. ह्याउलट मण्यारवाडी मध्ये जेव्हा २०१२ मध्ये जमीन नियमानुकुलीत होऊन मिळाली, त्यांनतर गायरानधारकांना स्वतःच्या विहिरी घेणे, तसेच कालव्यातील पाणी मिळवणे शक्य झाले. राजुरी घोडका ह्या गावात १९५० च्या दशकातच जमीन नियमानुकुलीत झाली होती, त्याठिकाणी शेतकऱ्यांना विहीर तसेच तलावातून उपसा सिंचन करण्याचे पर्याय उपलब्ध आहेत. ह्यागावात पाहिलेल्या एका उदाहरणामध्ये तीन दलित आणि तीन उच्चजातीय अशा एकूण सहा शेतकऱ्यांनी मिळून सामायिक विहीर घेऊन शेतीसाठी पाण्याची सोय केली होती.

असे असले तरी लाखणगाव आणि उपळी ह्या दोन गावांमध्ये जमिनी नावावर झाल्या नसल्या तरी शेतकऱ्यांनी सिंचनाच्या काही सोयी स्वतःसाठी निर्माण केल्या आहेत. लाखणगाव मध्ये गायरान जमिनीच्या जवळ असलेल्या तलावातून उपसा करून, तर उपळीमध्ये कुंडलिक धरणातून उपसा करून पाणी मिळविले जाते. ह्याठिकाणी जमीन नावावर नसतानाही पाणी उपलब्ध होण्यामागे अनिक मधून मिळालेले कर्ज, स्थानिक राजकारणात काही गायरानधारकांचा असणारा प्रभाव, जमीन अधिकार आंदोलनाचा अधिक प्रभाव, त्याबद्दल गावकऱ्यांना असणारी माहिती आणि भीती हे घटक असलेले दिसतात. अशा प्रकारचा प्रभाव घारगावमध्ये नसल्याने कालव्याचे पाणी उपलब्ध असून देखील ते मिळविणे ह्याठिकाणी गायरानधारकांना शक्य झालेले नाही. तसेच जमीन नावावर नसताना आणि कधीही तिथून हटवले जाईल ही भीती असताना सिंचनासाठी एवढी मोठी गुंतवणूक सर्व गायरानधारक करू शकत नाहीत. उपळी गावामध्ये एवढी गुंतवणूक कशी केली असे विचारले असता, संघटनेच्या माध्यमातून जमीन नावावर होईल असा विश्वास वाटत असल्याचे लोकांनी सांगितले.

पाण्याच्या उपलब्धतेमुळे गायरानधारकांच्या शेतीमध्ये किती सकारात्मक फरक पडू शकतो ह्याचे उदाहरण उपळी गावात दिसून येते. येथील अनेक गायरानधारकांनी उपसा सिंचनाची सोय करून घेतल्या नंतर

त्यांना रबीचे पिक घेणे शक्य झाले त्यांच्या उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ झाली, उत्पन्न वाढले आणि शेतीच्या बरोबरीने उपजीविकेची इतर साधने निर्माण करणे त्यांना शक्य झाले.

### *मजूर*

सध्या कामाचे स्वरूप आणि काळ तसेच मजुरांची उपलब्धता ह्यानुसार मजुरीचा दर महिलांना दिवसासाठी १०० ते २५० तर पुरुषांसाठी दिवसाला ३०० ते ४०० रु एवढा आहे. ह्या दराने शेतीमधील कामे करण्यासाठी मजूर लावल्यास उत्पादन खर्च वाढतो, त्यामुळे गायरानधारक स्वतःच शेतीमधील कामे करण्यास प्राधान्य देतात. काही दलित गायरानधारक कुटुंबांतील काही सदस्य नोकरी/कामानिमित्त गावाबाहेर गेलेले असल्याने कुटुंबातील शेतीमध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्या कमी होते. असे असले तरी शक्य तोवर मजूर न लावण्यावरच भर असतो. परंतु काही कामे - जसे की काढणी -ठराविक वेळेत पूर्ण करावी लागतात. अशा वेळी इतरांची मदत घेणे गरजेचे पडते. अशा वेळेस बहुतेक करून गायरानधारक एकमेकांच्या शेतात कामाला मदत करून बाहेरील मजुरांची गरज भागवतात. ह्या पद्धतीला सावड असे म्हणतात.

एकट्या शेती करणाऱ्या महिलांना कुटुंबातील पुरुष सदस्यांचे सहकार्य नसल्याने अधिक कामांसाठी मजूर बोलावून काम करून घ्यावे लागते. त्यामुळे त्यांचा उत्पादनाचा खर्च वाढतो.

जात आणि मजुरांची उपलब्धता ह्याचा जवळचा संबंध आहे. ज्यावेळी गायरानधारकांना मजुरांची गरज पडते, त्यावेळी त्यांच्याकडे कामाला येणारे मजूर हे देखील दलित जातींचेच असतात. उच्चजातीय मजूर त्यांच्याकडे कामाला येत नाहीत. एका गायरानधारक महिलेच्या म्हणण्याप्रमाणे उच्चजातीय पुरुष उपकरणे घेऊन नांगरणी/पेरणी सारखी कामे करून देतात, पण उच्चजातीय महिला मात्र मजूर म्हणून त्यांच्या शेतात काम करत नाहीत. मण्यारवाडीमध्ये ज्यांना जमीन नावावर करून मिळाली आहे तेथील गायरानधारकांनी सांगितले, *“महाराकडे मराठे मजूर म्हणून येत नाहीत. आपल्या समाजातलेच येतात. आम्हाला जमीन मिळाली हे त्यांना बरं वाटत नाही त्यामुळे ते आमच्याकडे मजुरीला येत नाहीत”*

### *कर्जाची उपलब्धता*



चित्र 5 अनिक्च्या कर्जाच्या मदतीने गायरान धारकाने सुरु केलेली गिरण व विकत घेतलेल्या शेळ्या

ज्या गायरानधारकांच्या नावाने अजून जमीन झालेली नाही त्यांना शेतीसाठी बँकेकडून कर्ज मिळू शकत नाही. त्यांच्यासाठी बचतगट हा कर्ज मिळविण्यासाठीचा प्रमुख स्त्रोत आहे. अभ्यास केलेल्या ज्या गावांत अजून जमीन मालकीची झाली नव्हती, त्याठिकाणी अनिक फायनान्स च्या बचतगटांमधून गायरानधारक कर्ज घेत होते. ही कर्जे बियाणे/ खते विकत घेणे, पाण्यासाठी मोटार किंवा पाईपलाईनची व्यवस्था करणे, जमिनीच्या मशागतीची कामे ह्यासारख्या शेतीच्या

कामांसाठी, किंवा गुरे किंवा कोंबड्या विकत घेणे, पिठाची गिरणी किंवा किराणा मालाचे दुकान सुरू करणे ह्यासारख्या उपजीविकेच्या व्यवसायांसाठी घेतली जात. काही वेळा लग्नसमारंभ, सण, मुलांचे शिक्षण इत्यादी वैयक्तिक कारणांसाठीही कर्ज घेतली जातात. अनिक मधून वार्षिक २४% (महिना २%) व्याजदराने कर्ज मिळते.

मोठ्या कर्जांची आवश्यकता असते त्यावेळी गायरानधारक ऊस तोडणी कामगार म्हणून उचल घेतात आणि खर्च भागवतात. बियाणे/खते विकत घेताना स्थानिक दुकानांमधून उधारीवर घेतली जातात.

जमीन नावावर झाल्यानंतर बँकेकडून कर्ज मिळू शकते. मण्यारवाडीमधील मारुती निसरगंध ह्यांनी ७.२% वार्षिक दराप्रमाणे इंडिया बँकेकडून पिककर्ज घेतले होते. राजुरी घोडका गावामध्ये मात्र अनेक वर्षांपूर्वी जमीन नावावर झाली असून देखील जमीन गायरान असल्याच्या कारणाने त्यांना बँकेकडून कर्ज मिळत नाही असे तेथील गायरान धारकांनी सांगितले. ह्या संदर्भात अधिक चौकशी करणे गरजेचे आहे.

## सामुहिक शेतीचा प्रयत्न

अनेक ठिकाणी जेव्हा दलितांनी गायरान जमीन ताब्यात घेऊन ती कसायला सुरुवात केली, त्यावेळी ती ते सामुहिक पद्धतीने कसत होते. जमीन साफ करण्यापासून, उत्पादन निघे पर्यंत सर्व कामे सामुदायिक पद्धतीने केली जात आणि मग उत्पादन सर्वांमध्ये वाटून घेतले जाई. परंतु ही पद्धत हळूहळू बदलत गेलेली दिसते.

लाखणगाव मध्ये २००२ मध्ये ज्यावेळी गायरान जमीन कसण्यास दलित कुटुंबांनी सुरुवात केली त्यावेळी सर्व ८० एकर जमीन ३० कुटुंबे मिळून कसत होती. सुरुवातीला प्रत्येक कुटुंबाने १००० रु योगदान देऊन जमिनीची मशागत करून घेतली, आणि त्यानंतर तेथे सेंद्रिय तुरीची लागवड केली. प्रत्येक कुटुंबातून काही व्यक्ती ह्या शेतीमध्ये काम करत. नंतर आलेले धान्य सर्वांमध्ये वाटून घेण्यात येई. हा प्रयोग त्यांनी पहिली दोन वर्षे केला. परंतु त्यांनतर मात्र त्यांनी सामुहिक शेतीचा प्रयत्न सोडून गायरान जमिनीचे वाटे करून प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र जमिनी काढून दिल्या. सामुहिक पद्धतीने शेती करताना प्रत्येक कुटुंबातून योगदान देणारी माणसे सारखी नसायची. ज्या घरातून जास्त लोक काम करायचे त्यांना आपल्याला जास्त वाटा मिळायला हवा असे वाटत होते. अशा प्रकारचे गैरसमज टाळण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला. तळ्याच्या बाजूला ज्या जमिनी होत्या त्याचे प्रत्येकी ३५ चौ फुटाचे, तर तळ्याच्या वरच्या बाजूला असणाऱ्या जमिनींचे प्रत्येकी ५० चौ फुटाचे वाटे करण्यात आले.

गायरान जमिनीच्या प्रश्नावर काम करणाऱ्या आर.पी.आय. (आठवले) गटाच्या स्थानिक नेत्यांनीही अशाच प्रकारचे अनुभव सांगितले. घाटसावळी गावात १९७० च्या दशकात 'डॉ बाबासाहेब आंबेडकर सहकारी संस्था मर्यादित, घाटसावळी' ह्या ट्रस्टच्या नावाने १२१ हेक्टर गायरान जमीन नियमानुकुलीत होऊन मिळाली. ह्या ट्रस्टमध्ये गावातील दलित कुटुंबांचा समावेश होता. तसेच माधवमुळे ह्या गावात अशाच प्रकारच्या 'महात्मा फुले सहकारी संस्था मर्यादित, माधवमुळे' ह्या ट्रस्टच्या नावाने जमीन मिळाली. व्यक्तिगत वाटण्या न करता समुहाने शेती करावी असा विचार त्यावेळी करण्यात आला होता. परंतु तो प्रयोग यशस्वी

होऊ शकला नाही. सध्या माधवमुळे गावात गायरान जमिनीचे गायरानधारक कुटुंबांमध्ये वाटप करून देण्यात आलेले आहे, आणि घाटसावळी मध्ये देखील त्यादृष्टीने प्रयत्न चालू आहेत. संस्था-संघटनांचा कल देखील सामुहिक शेतीच्या दृष्टीने काही पावले उचलण्याकडे दिसत नाही. आर.पी.आय. (आठवले) गटाच्या सुभाष तांगडे ह्यांच्या म्हणण्या प्रमाणे, *"ते सगळ्यांना सोबत घेऊन येणं, बसणं, त्यांचं विचारमंथन होणं हे अवघड वाटतं. आणि पैसा म्हंटला की वादविवादाचं स्वरूप तयार होतं. ते अशा उद्देशान असं करायचं असं बहुतेक होणार नाही."*

जमिनीच्या स्वतंत्र वाटण्या होऊन प्रत्येक गायरानधारक कुटुंब स्वतःची शेती करत असले तरी काही गावातील गायरान धारक शेतीमधील काही प्रक्रिया अजूनही एकत्र करतात असे दिसते. नांगरणी, पेरणी तसेच मळणी सारख्या प्रक्रिया ज्यासाठी त्यांना बाहेरून मदत घ्यावी लागते, त्या ते एकत्रपणे करतात. सर्वजण मिळून औतवाल्याला बोलावतात किंवा मळणीचे यंत्र भाड्याने घेतात. त्यामुळे वेळ आणि पैसा वाचतो, तसेच गावातील इतर शेतकऱ्यांना त्यांची एकी दिसून येते.

लाखणगाव मध्ये वर्षाच्या सुरुवातीला सर्व शेतकरी एकत्र येऊन काय पिके घ्यायची ह्याबद्दल चर्चा करतात. जमीन पडीक राहणार नाही, तसेच सर्वांचे पिक एका वेळेलाच निघेल अशा प्रकारे नियोजन केले जाते. ह्या सर्व प्रक्रिया अनौपचारिक पद्धतीने घडत असतात.

गायरानधारकांमध्ये सामुहिक शेतीची दिसणारी आणखी एक पद्धत म्हणजे सावड. हे शेतकरी मजुरांवरील खर्च वाचविण्यासाठी एकमेकांच्या शेतात कामात मदत करतात.

राजुरी घोड्का मध्ये शेतकऱ्यांच्या एका गटाने एकत्र येऊन विहिरीची सामायिक सोय केलेली आहे. साधारण २० वर्षांपूर्वी ३ दलित आणि ३ मराठा शेतकऱ्यांनी मिळून गावातील तलावाच्या जवळ एक विहीर घेतली. संजीवनी पवार ह्या त्या गटातील एकट्या महिला आहेत. दलित कुटुंबांची शेती तलावापासून थोडी अधिक लांब असल्याने त्यांना पाईपलाईनचा खर्च थोडा अधिक आला. मराठा शेतकऱ्यांनी विहीर खोदण्याच्या खर्चातील मोठा वाटा उचलण्याची तयारी दाखवली. त्यांच्यातील ही व्यवस्था आजही चालू आहे. प्रत्येक शेतकऱ्याला १५ दिवसातून एकदा पाणी मिळते. शेताच्या क्षेत्रफळानुसार प्रत्येकाला किती दिवस पाणी मिळेल हे ठरलेले आहे.

संपूर्णपणे सामुहिक शेती करण्याची पद्धत नसली तरी शेतीला हातभार लागेल, सोय होईल ह्या दृष्टीने अशा वेगवेगळ्या प्रकारच्या सामुहिक प्रक्रिया गायरानधारक करताना दिसतात.

## उपजीविकेचे इतर पर्याय

गायरानजमिनीवरील शेती ही हंगामी आणि कुटुंबाच्या खाण्यापुरते अन्नधान्य पिकविणारी असल्यामुळे त्याच्या बरोबरीने गायरानधारकांना उपजीविकेची इतर पर्याय देखील शोधावे लागतात. गायरानधारक महिला हजेरीवर मजुरीला जाणे, शेतीच्या कामांची कंत्राटे घेणे, गुरे सांभाळणे, बांगड्याचे दुकान, किराणाचे दुकान, पिठाची गिरणी चालविणे, शिलाई इत्यादी कामे करतात. पुरुष गायरानधारक शेतमजूर, बांधकाम

मजूर, बांधकामाचे कंत्राट घेणे, रिक्षा, गाडी (व्यवसायासाठी) घेणे किंवा सालाने गडी म्हणून मजुरी करतात. नवरा-बायको जोडीने उसतोडीच्या कामासाठी उचल घेतात. तरुण पिढीमध्ये शहरांमध्ये जाऊन नोकऱ्या करणाऱ्या लोकांचे प्रमाणही वाढले आहे.

## गायरान जमीनीचे भूमिहीन दलितांच्या उपजीविकेसाठी महत्व

गायरान जमीन मिळविण्यासाठीचा संघर्ष मोठा आहे, आणि ती जमीन कसत राहण्यातील अडचणीही कमी नाहीत. परंतु मर्यादित संसाधने असताना देखील गायरान धारक जिद्दीने जमीन कसतात. ही जमीन कसून मिळणारे उत्पादन त्यांच्या उपजीविकेसाठी केवढा मोठा हातभार आहे हे ह्या सर्व केसेसमध्ये ठळकपणे दिसून आले.

ताई सुरवसे म्हणतात की गायरान कसायला लागल्यापासून त्यांना अन्नधान्य मिळविण्यासाठी मोठा आधार झाला आहे. *"आता सगळे आपापलं व्यवस्थित करतात. तुरी, बाजरी, ज्वारी असं दोन दोन पोती होतंय आता. आणि २५-३० हजाराचा कापूस पण होतोय."* कांता इचके म्हणतात की गायरान कसायच्या आधी त्या इतरांच्या शेतात रोजाने किंवा सालानेही मजुरी करायचे. अमावास्येच्या दिवशी उच्चजातीय शेतकऱ्यांकडून भिक मागायचे व त्यावर काही दिवस भागवायचे. परंतु स्वतः शेती करायला लागल्यापासून त्याची गरज राहिली नाही. धानोरा मधील एक गायरानधारक महिला म्हणते की ह्यापूर्वी ते इतरांच्या शेतात, घरात नोकर म्हणून काम करायचे, पण आता त्यांचे अवलंबित्व कमी झाले. आताही ते शेतमजूर म्हणून काम करतात, पण आता उपजीविकेसाठी इतर पर्यायही त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. गायरानधारक शेतकऱ्यांमध्ये उसतोडीसाठी जाण्याचे प्रमाण देखील पूर्वीपेक्षा कमी झाले आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे त्यामुळे त्यांचा आत्मसन्मान वाढण्यास मदत झाली. मारुती निसरगंध ह्यांच्या मते नवरा-बायको आणि त्यांची मुले ह्यांच्या छोट्या कुटुंबाला गायरान जमिनीमुळे पुरेसा आधार मिळू शकतो. *"माणसाला वाटतं जमीन मिळावी असं. त्याला पण फार कष्ट आहेत, पण तरी जमीन असावी. म्हणजे कसं. पाहुणे राऊळे असले त्यांनी आपला हुरडा जरी खाल्ला तर आपला उपकार फिटला. बाबासाहेबांचं उपकार समजायचं की ही जमीन आहे. नाही तर किती तरी लोक गुंडगिऱ्या वगैरे करत होते. पहिले सगळे लोक काही बाही काम करत होते. त्यांना कोणी विचारत नव्हतं. आता जमीन मिळाली तर पोटाला पोटभर मिळतंय."*



चित्र 6 मण्यारवाडी येथील नियमानुकुलीत झालेली गायरान जमीन

गायरानधारकांना शेतीसाठी योग्य ती संसाधने आणि निविष्ठा मिळाल्यास ते उपजीविकेचे पर्याय कसे उभे करू शकतात ह्याचे उपळी हे चांगले उदाहरण आहे. कांता इचके म्हणतात, *"सुरुवातीला गावातील लोक म्हणायचे यांना ट्रॅक्टर द्यायचा नाही. मग तिथून (मानवी हक्क अभियान) ते ट्रॅक्टर औजारं, बी-बियाणे*

*पाठवायचे. पण आता सगळ्यांकडं शेतीनं पैसे आले. मग कुणी बैल घेतले, औजारं घेतली, गाडी घेतली. आता काहींनी ट्रॅक्टर सुद्धा घेतला आहे. पाईपलाईन केल्या, ऊस लावला. आता चांगले पैसे मिळायला लागले. बचतगटातून कर्ज मिळाल्यामुळे सावकाराकडे जायची गरज नाही. पूर्वी खायला ५-१० किलो मिळवायची अडचण होती. पण आता काही बघायचं काम नाही."*

## समारोप

अभ्यासात पाहिलेल्या उदाहरणांवरून गायरान नियमानुकुलीत करण्यामधील विविध प्रकारच्या अडचणी प्रकर्षाने समोर येतात. दलित गायरानधारकांचा लढा ५० वर्षांहून अधिक काळापासून चालू आहे जोपर्यंत जमिनी नियमानुकुलीत होत नाहीत, तोवर त्याठिकाणी शेती करण्यामध्ये विविध अडचणी आहेत. परंतु तेच जमिनी नियमानुकुलीत होऊन मिळाल्यास त्याचा भूमिहीन दलितांच्या उपजीविकेवर कसा सकारात्मक परिणाम होऊ शकतो हे दिसून येते. शासनाच्या नियमांप्रमाणे गायरानधारकांच्या जमिनी नियमानुकुलीत होणे गरजेचे आहे.

जमिनी मिळविण्यासाठीच्या लढयामध्ये, आणि शेती व्यवस्थापनामध्ये गायरानधारक महिला अग्रभागी राहिल्या आहेत. परंतु प्रत्यक्ष जमिनी नियमानुकुलीत होताना मात्र त्या केवळ पुरुषांच्या नावाने होतात. जमिनी पती-पत्नी दोघांच्या संयुक्त नावाने देण्याबद्दलचा नियम असूनही एक तर त्याबद्दल पुरेशी माहिती नाही म्हणून किंवा महिलांच्या नावाने जमीन करण्यासाठीचा विरोध म्हणून प्रत्यक्षात हे होताना दिसत नाही. तसेच नियमानुकुलीत झालेल्या गायरान जमिनींमध्ये वारसा हक्काने महिलांना त्यांचा हक्क मिळविणेही अवघड आहे असे दिसते.

गायरानधारकांमध्ये संपूर्ण शेती एकत्र करण्याकडे कल नसला, तरी शेतीमधील अनेक प्रक्रिया ते सामुहिक पद्धतीने करतात असे दिसते. गायरान धारकांना गावातील इतर शेतकऱ्यांकडून होणारा विरोध, तसेच शेतीला येणारा खर्च पाहता ही एक चांगली पद्धत आहे.

जमीन जोवर नियमानुकुलीत होऊन नावावर होत नाही, तोपर्यंत त्या जमिनीवरील शेती साठी पाणी, क्रेडीट अशा निविष्ठा मिळविणे गायरानधारकांना कठीण जाते. ज्याठिकाणी जमीन नावावर नसतानाही गायरानधारकांनी ह्या सुविधा मिळविल्या होत्या त्याठिकाणी त्यांचा स्थानिक राजकारणावर असणारा परिणाम इत्यादी गोष्टी कारणीभूत होत्या. परंतु सरसकट गायरानधारकांना ते शक्य होत नाही. त्यामुळे जमीन नियमानुकुलीत झाली नसली, तरी ह्या गायरानधारकांना शेतकऱ्यांचा दर्जा मिळून त्यानुसार योग्य त्या निविष्ठा आणि सुविधा कशा मिळवून देता येतील हे पाहणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे आवश्यक त्या निविष्ठा उपलब्ध झाल्यास गायरान जमिनीच्या आधारे भूमिहीन दलित कुटुंबांच्या उपजीविकेसाठी मोठा आधार मिळू शकतो.

## संदर्भ सूची


- Andolan, P.o. (2004). Grazing Lands & Landless Dalits in Marathwada.
- Paryay. (2004). Grazing Lands & Landless Dalits in Marathwada.
- SOPPECOM. (2012). Women and Land Rights: A Study of Campaigns led by SWISSAID India partners : YUVA Rural, Sakav and RDC.
- खुंटे, प. (२०११, फेब्रुवारी). दलितांच्या आर्थिक सन्मानाचा लढा. अर्थपूर्ण वर्ष १, अंक ४.
- धुळप, प. (२०१५, ऑक्टोबर). महिला वंचितांच्या विवेकाचा 'जागर : मनीषा तोकले'. अनुभव, pp. ४०-४५.
- पंदेरे, श., & तोडकर, व. (n.d.). वन अधिकार कायदा धर्तीवर गायरान व पडीत जमिनीचे संयुक्त हक्क देणारा कायदा करा.
- बोकील, म. (१९९६, जानेवारी - मार्च). मराठवाड्यातील गायरानांवरील अतिक्रमणे. समाज प्रबोधन पत्रिका, pp. ९-२२.